दु.क्र.०२०-२४४७६९३८
Email-
arts.sportsdept@maa.ac.in

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र**
७०८ सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे - ४११०३०.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

.क्र.राशैप्रप/कलाक्रीडा/प्रस्ताव /२२-२३/ 128 दि.३०/१२/२०२२

प्रति,
अध्यक्ष,
पुणे विपश्यना समिती,
स्वारगेट, पुणे ०२

**विषय:** मित्र उपक्रम शाळांमध्ये राबविणेसाठी मान्यता देणेबाबत.
**संदर्भ :** १. आपल्या संस्थेचा परिषदेस प्राप्त प्रस्ताव.
२. शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०११(२९६/११)माशि-३ दि. २७ जानेवारी २०१२

उपरोक्त विषय व संदर्भीय पत्रांनुसार आपल्या संस्थेचा पुणे व पिंपरी चिंचवड मधील सर्व माध्यमांच्या आणि सर्व व्यवस्थापनांच्या सर्व शाळांमध्ये मित्रा हा उपक्रम राबविण्यासाठीचा प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झाला आहे.

सदर प्रस्तावानुसार आपण पुणे व पिंपरी चिंचवड परिसरातील शाळांमध्ये शिक्षक, व ५वी ते १०वी चे विद्यार्थी यांच्यासाठी आनापान साधना प्रशिक्षण देण्याचे प्रस्तावित केले आहे. विद्यार्थ्यांची एकाग्रता व मनोनिग्रह वाढविणे, आत्मविश्वास, स्वयंशिस्त, आणि निर्णयक्षमता वृद्धिंगत करणे, स्मरणशक्ती आणि समज वाढविणे, नवनिर्मिती क्षमता आणि क्रियाशीलता वाढविणे, ताणतणाव कमी करणे, आणि आंनदी व उत्साही राहण्यास मदत करणे अशा उद्देशाने आनापान साधना उपक्रमाचे आयोजन करावयाचे आहे.

उपरोक्त संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांतून आनापान साधना वर्ग सुरु करण्याचे आदेश दिलेले आहेत.सदर कार्यक्रम राज्यातील सर्व इयत्ता ५वी ते १०वी पर्यंत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मानसिक व बौद्धिक वाढीकरिता उपकारक ठरणार आहे. त्यामुळे शालेय स्तरावर या उपक्रमाची अंमलबजावणी करावी असे नमूद केले आहे.

तरी हा उपक्रम शाळांमध्ये राबविणेसाठी आपणास मान्यता देण्यात येत आहे. उपरोक्त शासन परिपत्रकानुसार शाळा सुरु होताना परिपाठांतर्गत व शाळा संपण्यापूर्वी दर दिवशी दिलेल्या ऑडीओ कॅसेटद्वारा मित्र साधनेचा अभ्यास करणे अशा रीतीने हा उपक्रम शाळेच्या वेळापत्रकात कोणतेही बदल न करता कार्यान्वित करावा.

भविष्यात शासनावर कोणताही आर्थिक भार पडणार नाही. तसेच विद्यार्थ्यांसाठी कोणतेही शुल्क न आकारता प्रस्तुत शैक्षणिक वर्षात सदर प्रस्तावित उपक्रम राबविता येईल, व तदनंतर उपक्रमाच्या परिणामकारकतेबाबत क्षेत्रीय अधिकारी यांचेकडून तसेच आपल्याकडून अहवाल घेण्यात येईल. व तदनंतर सदर उपक्रम राज्यातील शाळांसाठी कार्यान्वित करता येईल,या अटींवर आपल्या संस्थेचा प्रस्ताव मान्य करण्यात येत आहे.

09/01/23

( राजेश पाटील भा प्र से)
संचालक
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,